पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण यांचे कार्यालय,
चव्हाण नगर, पाषाण रोड, पुणे 411 008
दूरध्वनी क्रमांक 020- 25657878 फॅक्स क्र. 020-25674641
ई मेल sp.pune.r @mahapolice.gov.in संकेतस्थळ
www.puneruralpolice.gov.in

# निविदा जाहिरात - साधन सामुग्री खरेदी: वर्षे २०२४-२०२५

जा.क्र. नोंशा/प्रबंधक/कोरेगाव भिमा २०२५ /२०२४ /6910 पुणे, दिनांक 18 /१२/२०२४.

पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण या आस्थापनेच्या वतीने दरवर्षीप्रमाणे या वर्षी दिनांक ०१/०१/२०२५ रोजी मौजे पेरणे फाटा, ता- हवेली फाटा, ता- हवेली, जि- पुणे येथे पार पडणाऱ्या कोरेगाव भिमा विजयस्तंभ शौर्य दिन साजरा करण्याकरिता प्रशासकीय सोयीसाठी निविदा पध्दतीने पुरवठादार/ निविदाकार यांचे पुढील साधनसामुग्री खरेदी करणेकामी दोन वेगवेगळया (१+१) बंद लिफाफ्यात निविदा मागविण्यात येत आहे.

| निविदा क्रमांक | कामाचे नाव | अंदाजित पुर्व गणित रक्कम रू. |
|---|---|---|
| SPPUNER/ DSMD /2024_11 | DSMD -1 Qty | 3,20,000/- |
| SPPUNER/ EVD /2024_12 | Explosive Detector MO8 (EVD) - 1 Qty | 25,000/- |
| SPPUNER/ TMM /2024_13 | Trolly Mounted Mirror with Torch - 5 Qty | 25,000/- |
| SPPUNER/ NMP /2024_14 | Non Metallic Prodder – 2 Qty | 4,000/- |
| SPPUNER/ EM /2024_15 | Extension Mirror – 2 Qty | 5,000/- |
| SPPUNER/ HHMD /2024_16 | HHMD- 1 Qty | 3,000/- |
| SPPUNER/ DSMD CHARGER/2024_17 | DSMD Charger – 1 Qty | 2500/- |
| SPPUNER/ TM CHARGER/2024_18 | TM Charger- 1 Qty | 5000/- |
| SPPUNER/ AXA LIGHT/2024_19 | ॲक्सा लाईट- 10 नग | 1,70,000/- |
| SPPUNER/ HELMAT CAMERA/2024_20 | हेल्मेट कॅमेरा - 10 नग | 40,000/- |
| SPPUNER/ HMR/2024_21 | हायटेरा मेक रिपीटर 01 Qty | 1,60,000/- |
| SPPUNER/ SMPS CHARGER/2024_22 | SMPS चार्जर 5 Qty | 17,500/- |
| SPPUNER/ HCC/2024_23 | हॅन्डसेट कॉईल कॉर्ड - 10 Qty | 36,666/- |
| SPPUNER/ MA/2024_24 | मॅग्नेट ॲन्टेना-10 Qty | 25000/- |
| SPPUNER/ 100 AHC/2024_25 | 12 V 100 AHC विजेरी - 5 Qty | 50,000/- |
| SPPUNER/ 42 AHC/2024_26 | 12 V 42 AHC विजेरी -10 Qty | 44,000/- |
| SPPUNER/ 65 AHC/2024_27 | 12 V 65 AHC विजेरी - 5 Qty | 40,000/- |
| SPPUNER/ BNC CONNECTOR /2024_28 | BNC Connector 50 Qty | 5,000/- |

महाराष्ट्र शासन, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भांखस २०२१/प्र.क्र. ८/उद्योग-४, दिनांक ०७ मे, २०२१ अन्वये दरपत्रकाचे आधारे वरील सेवा उपलब्ध करून घेण्यात येणार आहे.

तरी सदर दरपत्रके/ निविदा व स्विकृती उघडण्याची कार्यवाही कालावधी हा पुढीलप्रमाणे राहील.

| | | |
|---|---|---|
| निविदा फॉर्म/ दरपत्रके सादर करणेची दिनांक | - | दिनांक १८/१२/२०२४ सकाळी १०.३० वा ते दिनांक २३/१२/२०२४ दुपारी १२.०० वाजेपर्यत. |
| निविदा फॉर्म/ दरपत्रके स्विकृतीचा अंतिम दिनांक | - | २३/१२/२०२४ रोजी दुपारी १२.०० वाजेपर्यत |
| निविदा फॉर्म/ दरपत्रके उघण्याचा दिनांक | - | २३/१२/२०२४ रोजी दुपारी १२.३० वाजता (शक्य झाल्यास) |

अ) सदर कामांबाबत निविदा अटी/ शर्ती इ. बाबतचा सर्व तपशील निविदा संचामध्ये नमूद केला असुन सदर कामांचे निविदा संच www.puneruralpolice.gov.in या वेबसाईटवर पाहण्यासाठी उपलब्ध आहे.

ब) निविदा संच हा शेवटच्या दिवशी प्राप्त न झाल्यास सेवा पुरवठादार/ ठेकेदारांची पुनश्च नव्याने निविदा जाहिरात प्रसिध्द करण्यात येणार नाही. निविदाकार यांनी अंदाजित पुर्व गणित रक्कम दर्शविल्याप्रमाणे लिफाफा क्र. २ मध्ये रक्कम कमी दराने रेट कोट करावयाचा आहे. दर्शविलेल्या रक्कमेपेक्षा जादा दराने रेट कोट करण्यात आलेली निविदा बाद समाजवण्यात येईल.



Scanned with OKEN Scanner

क) महत्वाची सूचना :- सदर कार्यालय कायदा व सुव्यवस्था राखण्याचे अत्यंत महत्वाचे काम करीत असल्यामुळे निविदा उघडणेची तारीख व वेळ कधीही बदल / रद्द / पुढे ढकलण्यात येवू शकते.

ड) सदर निविदेची मुदतवाढ झाल्यास वर्तमानपत्रात जाहिरात दिली जाणार नाही. संबधितानी वेबसाईटला भेट देवुन लक्ष दयावे. मागविलेल्या निविदा कोणत्याही स्तरावर कोणतेही कारण न देता रदद करण्याचे अधिकार पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण यांनी राखुन ठेवलेले आहेत.

इ) अनुदान अभावी निविदा रदद झाल्यास निविदाकार यांनी सादर केलेली निविदा शुल्क/सादर कागदपत्रे परत करणेबाबत कार्यालय कसल्याही प्रकारची हमी देत नाही.

ई) निविदाकार यांनी बंध लिफाफा क्रमांक १ मध्ये सादर करावाची कागदपत्राचा तपशील पुढील प्रमाणे आहे.

लिफाफा क्र. १) **निविदा कारांनी सोबत जोडायची कागदपत्रे**

j. निविदाकार कंपनीचे पूर्ण नाव व पत्ता दूरध्वनीसह

k. निविदाकार कंपनीचे मालकाचे / भागीदारांचे / संचालकांचे पूर्ण नाव व पत्ते दूरध्वनीसह

l. निविदाकार कंपनीचे व्यवसाय नोंदणी प्रमाणपत्र (Company incorporation / Shop Act)

m. निविदाकार कंपनीचे / मालकाचे PAN Card / TAN Card.

n. निविदाकार कंपनीचे मागील ०३ वर्षांचे Income Tax Return.

o. निविदाकार कंपनीचे GST Registration Certificate.

p. MHA/ गृह मंत्रालय/ शासकीय व निमशासकीय /खाजगी संस्थेमधील किमान वस्तु पुरवठा केलेबाबतचे ०२ वर्षाचा अनुभव आवश्यक त्या कागदपत्रांसह. (सोबत work order / Purchase Order जोडणे बंधनकारक)

q. निविदाकार कंपनी किंवा त्यांचे मालक / संचालक / भागीदार व त्यांचे जवळचे नातेवाईक यांच्यावर कोणत्याही सरकारी किंवा निमसरकारी कार्यालयामध्ये फ़सवणुकीची / गैरप्रकाराची किंवा भ्रष्टाचाराची कोणतीही चौकशी चालू / प्रलंबित नसली पाहिजे. तसेच निविदाकार कंपनीचा समावेश सरकारी काळ्या यादीत नसला पाहिजे. अशा प्रकारचे प्रतिज्ञापत्र ₹ २०/- च्या कोर्ट फी स्टॅम्प पेपर वर देणे बंधनकारक आहे. (सोबत नमुना परिशिष्ट - ०१)

r. निविदाकार कंपनीचे मालक / संचालक / भागीदार व त्यांचे जवळचे नातेवाईक उदा. आई, वडील, भाऊ, बहीण, पत्नी, पती, मुलगा, मुलगी यांच्या नावावर दोन किंवा जास्त समान व्यवसाय करणाऱ्या स्वतंत्र अथवा भागीदारीमध्ये वेग वेगळ्या कंपन्या रजिस्टर / नोंदणीकृत असल्यास सदर कंपनी व मूळ कंपनी अशा दोन किंवा जास्त निविदा सादर करता येणार नाहीत. तसेच अशा प्रकारच्या दोन किंवा जास्त निविदा एकाच वेळी व एकाच निविदेसाठी इतर कोणत्याही शासकीय कार्यालयात सादर केल्या असतील व तसे करुन मूळ कंपनीच्या नावावर काम घेतले असेल किंवा नसेल, अशा कंपन्यांना साखळी करुन (Ring) निविदा प्रक्रिया केली, असे संबोधले जाईल व अशा कंपन्यांच्या निविदा रद्द करण्यात येतील. निविदा सादर करणाऱ्या सर्व निविदाकारांनी स्वतःचे प्रतिज्ञापत्र ₹ २०/- च्या कोर्ट फी स्टॅम्प पेपर वर सोबत जोडलेल्या नमुन्या प्रमाणे देणे बंधन कारक आहे. (सोबत नमुना परिशिष्ट - ०२)

जी) निविदाकार यांनी बंध लिफाफा क्रमांक २ मध्ये सादर करावाची कागदपत्राचा तपशील पुढील प्रमाणे आहे.

b. निविदाकार कंपनीचे पूर्ण नाव व पत्ता दूरध्वनीसह तपशील असणाऱ्या लेटर हेडवर व्यावसायिक दरांचा उल्लेख नमूद करून बंद लिफाफा सादर करावयाचा आहे.

एच) तरी तांत्रिक दृष्टया पात्र असणा-या निविदाकार दरपत्रके बंद पाकिटात खरेदी समिती समक्ष सादर करणेची दक्षता घ्यावी.

**मा. पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण यांचे मान्यतेने**

( दिलीप शिंदे )
पोलीस उप-अधीक्षक (मुख्या.).,
पोलीस अधीक्षक कार्यालय, पुणे ग्रामीण.

प्रति, सर्व मेसर्स,

---

Scanned with OKEN Scanner

**अटी व शर्ती - कराराच्या मुख्य अटी व शर्ती -**

1. कराराचा कालावधी हा ०१ वर्षाचा राहील. समाधानकारक सेवा न दिल्यास करार कालावधीमध्ये सदर करार केंव्हाही रद्द करण्याचा अधिकार पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण यांनी राखून ठेवला आहे.
2. पुणे ग्रामीण पोलीस हे कायदा व सुव्यवस्था राखण्याचे अत्यंत महत्वाचे काम करीत असल्यामुळे अचानकपणे बऱ्याच वस्तूंची गरज भासते. त्याचबरोबर तातडीने सेवा मिळणे त्यामुळे निविदाकार आस्थापना ही महाराष्ट्र राज्यात नोंदणीकृत असावा व त्याचे कार्यालय हे पुणे / पिंपरी चिंचवड महानगर व महाराष्ट्र राज्य क्षेत्रामध्ये असल्यास प्राधान्य देण्यात येईल.
3. पुणे ग्रामीण पोलीस आस्थापनेवर कोरेगाव भिमा बंदोबस्त हा महत्वाचा बंदोबस्त असल्या कारणाने, पुरवठा आदेश दिल्यापासुन कार्यालयाचे बंदोबस्त नोंडल अधिकारी यांनी सुचीत केल्याप्रमाणे प्रसिध्दी निविदेतील वस्तु तात्काळ पुरवठा करावयाचा आहे. वस्तु पुरवठा करणेकामी पुरवठादारास कसल्याप्रकारचा अग्रीम मिळणार नाही.
4. या कार्यालयास न्यूनतम दराची निविदा मान्य करण्याचे बंधन असणार नाही. कार्यालयाच्या कामकाजाच्या हितासाठी अन्य यथोचित निविदा मंजूर करण्याचे अधिकार या कार्यालयाने राखून ठेवले आहेत.
5. निविदाकारास एकदा पुरवठा आदेश प्राप्त झालेनंतर साधन सामुग्री उपलब्ध करून देण्यास नकार दिल्यास अशा परिस्थितीत सदरचे निविदा दुसऱ्या पात्र निविदाकार यांना देण्यात येईल. परंतु नकार देणाऱ्या पुरवठादारास दंड म्हणुन निविदेच्या १० टक्के रक्कम दंड स्वरूपात या कार्यालयास भरावी लागेल.

**लखोटा क्रं. 1 (तांत्रिक) व लखोटा क्र. 2 (व्यावसायिक) उघडण्याबाबत -**

लखोटा क्रं. १ (तांत्रिक) हा दिनांक ०१/१२/२०१६ च्या उद्योग व उर्जा विभागाकडील शासन निर्णयातील (२.९.४) सुचनेनुसार गठीत केलेल्या समितीसमोर उघडण्यात येईल. तसेच लखोटा क्रं १ (तांत्रिक) मधील सर्व कागदपत्रांची तपासणी समितीमार्फ़त केली जाईल. त्यासाठी गरज लागल्यास जास्त वेळ मागून घेण्यात येईल. कागदपत्रांची तपासणी निविदाकारांसमोरच करण्याचे बंधन समितीवर नसेल. समितीच्या वेळेनुसार व गरजेनुसार कागदपत्रांची छाननी व तपासणी केली जाईल. तसेच त्याबाबतीत अंतिम निर्णय हे मा. पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण हे समिती चे अध्यक्ष या नात्याने घेतील व तो निर्णय सर्वांवर बंधनकारक असेल. समितीचा निर्णय यथावकाश सर्व निविदा धारकांना कळविण्यात येईल. तांत्रिक निविदा पात्र असणाऱ्या निविदाकार यांचा लखोटा क्र.२ (व्यावसायिक) निविदा उघडण्यात येईल.

**निविदेचा वैधता कालावधी -**

निविदेचा वैधता कालावधी तांत्रिक लिफाफा उघडल्यानंतर किमान 120 दिवस असेल. 120 दिवसांपेक्षा कमी कालावधी दर्शविलेल्या निविदा नाकारण्यात येतील. तसेच सदर निविदा किमान एक वर्षासाठी लागु आहे.

Scanned with OKEN Scanner

(₹ 20 च्या कोर्ट फी स्टॅम्प)

**(१) परिशिष्ट -1**

(मालकाचे / भागीदार / संचालक यांचे प्रतिज्ञापत्र)

**प्रतिज्ञापत्र**

मी / आम्ही ---------------------------------------------- (मालकाचे / भागीदारांचे / संचालकांचे नाव व पत्ता) -------------------------पुणे ग्रामीण पोलीस अधीक्षक कार्यालयामध्ये / **आस्थापनेवर कोरेगाव भिमा बंदोबस्त सन 2025 च्या अनुषंगाने साधन सामुग्री पुरवठा** करणेबाबत निविदा----------------------------------- ही साधन सामुग्री --------------------------------------------नग संख्या---------------------- पुरवठा करणेकामी (निविदाकार कंपनीचे नाव व पत्ता) ------------------------------------------------------------ नावाने भरत आहोत.

मी / आम्ही तसेच माझी कंपनी यांचे विरोधात कोणत्याही सरकारी कार्यालयामध्ये निविदा भरण्याच्या दिनांक / /2024 रोजी पर्यंत कोणतीही गैरप्रकार, अफरातफर गैरव्यवहार, फसवणूक तसेच भ्रष्टाचार या विषयी कोणतीही चौकशी चालू नाही किंवा प्रलंबित नाही.

तसेच अशा प्रकारची कोणतीही चौकशी माझे / आमचे जवळचे नातेवाईक (आई / वडील / बायको / नवरा / भाऊ / बहीण) यांचे विरोधात सुध्दा चालू नाही.

**सही**

**निविदाकार कंपनीचे मालक / भागीदार / संचालक**

Scanned with OKEN Scanner

(₹ 20 च्या कोर्ट फी स्टॅम्प)

(२) परिशिष्ट - 2

(मालकाचे / भागीदार / संचालक यांचे प्रतिज्ञापत्र)

**प्रतिज्ञापत्र**

मी / आम्ही ---------------------------- (मालकाचे / भागीदारांचे / संचालकांचे नाव व पत्ता) ----------------------- पुणे ग्रामीण पोलीस अधीक्षक कार्यालयामध्ये / **आस्थापनेवर कोरेगाव भिमा बंदोबस्त सन 2025 च्या अनुषंगाने साधन सामुग्री पुरवठा** करणेबाबत निविदा---------------------------------- ही साधन सामुग्री ------------------------------------------नग संख्या--------------------- पुरवठा करणेकामी (निविदाकार कंपनीचे नाव व पत्ता) ------------------------------------------------------ नावाने भरत आहोत.

मी / आम्ही सदर कंपनीचे संचालक असून आमच्या संचालकांच्या जवळच्या नातेवाईक (मालक / संचालक व त्यांचे जवळचे नातेवाईक उदा. आई, वडील, भाऊ, बहीण, पत्नी, पती, मुलगा, मुलगी) यांच्या नावावर दोन किंवा जास्त समान व्यवसाय करणाऱ्या स्वतंत्र अथवा भागीदारीमध्ये वेग वेगळ्या कंपन्या रजिस्टर आहेत / नाहीत. (असल्यास त्यांची नावे देण्यात यावीत.)

तसेच सदर दोन किंवा त्यापेक्षा जास्त असणाऱ्या कंपन्यांनी मिळून कोणत्याही एका शासकिय निविदा प्रक्रियेमध्ये एकत्र सहभाग नोंदविलेला नाही. तसेच अशा प्रकारचे कोणतेही शासकीय काम घेतलेले नाही. अशा प्रकारची तक्रार आढळून आल्यास मला व माझ्या कंपनीला सदर निविदा प्रक्रियेमधून रद्द करण्यात येईल, याची मला जाणीव आहे.

**सही**

**निविदाकार कंपनीचे मालक / भागीदार / संचालक**

Scanned with OKEN Scanner